National Seminar | The New Miraj Education Society's Kanya Mahavidyalaya, Miraj (Maharashtra) | Special Issue 1st February, 2020



# बलात्कार : कारणे आणि उपाय

**प्रा. प्रगती भाऊराव हरले (कुकडे)**
समाजशास्त्र विभाग, एस.ए.डी. महाविद्यालय, नागपूर
मो. ०९९२१६२८४०९, ई-मेल prgtkukade12@gmail.com

बलात्कार हा जगाच्या प्रत्येक कोप-यात होतो. तो दिवसा आणि रात्री होतो. आधुनिक वस्त्र परिधान केले आणि साडी किंवा बुरखा घातला तरीही बलात्कार होतो. तो काही वर्षांच्या नव्हे तर काही महिन्यांच्या मुलीपासून तर ८० वर्षांच्या म्हातारीवर देखील बलात्कार होतो. बलात्कार हा अनोळखी व्यक्तीकडूनच होतो असे म्हणता येत नाही. ब-याचदा जवळच्या नातेवाईकांकडून बलात्कार झालेले आढळून येतात. यात काका, मामा, बहिणीचा दीर, मामेभाऊ, आतेभाऊ, सावत्र भाऊ, मानलेला भाऊ, भावाचा मित्र, सावत्र वडील, सासरा इ. जवळच्या कोणत्याही व्यक्तीकडून होणा-या बलात्काराचे प्रमाण जास्त आहे. असे बलात्कार जवळच्या नातेवाईकाकडून होत असल्यामुळे ते ब-याचदा उघड होत नाही किंवा बलात्का-याला कोणत्याही प्रकारची शिक्षा होत नाही.

बलात्कार ही स्त्रियांची समस्या आहे. कारण तो जास्तीत जास्त केसेसमध्ये स्त्रियांवर होतो. भारतात 'ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च डेव्हलपमेंट' नुसार दर दोन तासांनी एक बलात्कार होतो.[1] बलात्कारातील बळींपुढे अनेक प्रश्न उभे राहतात. त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. बलात्कारपिडीत स्त्रिया निसर्ग तिला क्षमा करीत नाही व समाजही तिला सहानुभूतीने वागवित नाही. बलात्कारपिडीत स्त्रिया किंवा मुली न्यायालयात जात नाही. इतकेच नव्हे तर तेथे न्याय मिळतोच असेही नाही.

**बीजकल्पना** :– स्त्री, बलात्काराची कारणे, पुरूषी मानसिकता, उपाय

**उद्दिष्टये** :–

समाजातील पुरूषसत्तात्मक व्यवस्थेमुळे स्त्रियांवर होणा-या लैंगिक अत्याचाराला / बलात्काराला प्रोत्साहन मिळते याचे अध्ययन करणे.

**उपकल्पना** :– पुरूषाच्या विकृत मानसिकतेमुळे आणि लैंगिक आकर्षणामुळे बलात्कार होतात.

मानसशास्त्रज्ञाच्या मते, बलात्कार हे गुन्हेगारातील मानसशास्त्रीय आजारामुळे घडून येतात. ते म्हणतात की, जेव्हा गुन्हेगारावर लैंगिक संबंधाचा दबाव येतो, तेव्हा या दबावामुळे लैंगिक अत्याचार घडून येतात. काही मानसशास्त्रज्ञाच्या मते, बलात्कारी असा व्यक्ती आहे, ज्याने बालपणापासून अनेक वाईट गोष्टी अनुभवल्या, कठीण परिस्थितीचा सामना केला. असा व्यक्ती स्त्रियांना यशस्वीतेत पाहू शकत नाही. त्यात त्याला स्वतःचा पराभव वाटतो. लैंगिक अपूर्णपणा वाटतो. त्यामुळे तो बलात्काराला प्रवृत्त होतो. हि थेअरी फक्त बलात्काराच्या काही केसेसमध्ये लागु होते.[2] तर समाजशास्त्रज्ञाच्या मते, बलात्कारी हे सर्वसामान्य व्यक्ती असतात, त्यांना कोणताही मानसिक आजार नसतो. समाजशास्त्रज्ञामध्ये बलात्काराविषयी दोन विचारप्रवाह आढळून येतात. काही समाजशास्त्रज्ञाच्या मते, समाज हा बलात्काराला जास्त लैंगिक परवानगी देणारा आढळतो. ज्यावेळी पुरूषांना वैयक्तिक नकार मिळतो, त्याचा परिणाम पुरूषांना स्त्रियांवर बलात्काराला प्रोत्साहित करते. तर काही समाजशास्त्रज्ञ लिंगभाव असमानतेच्या स्त्रीवादी सिद्धांतानुसार बलात्काराला बघतात.[3]

जग बदलत आहे. नविन समस्या निर्माण होत आहे. लहान, कोवळ्या वयाच्या मुलींवर बलात्कार होताना आढळून येते. यातील काही उदाहरणे पुढीलप्रमाणे–